# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:12.05.2026** **वार: मंगळवार**

---

1. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशातील साधनसंपत्तीवरचा ताण कमी करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावं-पंतप्रधानांचं आवाहन,
2. देशात पेट्रोलियम उत्पादनांचा तुटवडा नाही; 60 दिवस पुरेल इतका कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याची केंद्र सरकारची माहिती,
3. भविष्यातील अर्थव्यवस्थेचं नेतृत्व करण्याची महाराष्ट्राची क्षमता असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन, आणि
4. विकसित भारत जी रामजी कायद्याची अधिसूचना जारी, 1 जुलैपासून अंमलबजावणी सुरू होणार.

**<u>पंतप्रधान</u>**

'पश्चिम आशियातील संघर्ष हा या दशकातील सर्वात मोठ्या संकटांपैकी एक आहे; या पार्श्वभूमीवर देशातील साधन संपत्तिवरचा ताण कमी करण्यासाठी देशवासीयांनी एकत्र यावं', असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमध्ये वडोदरा इथं सरदारधाम वसतिगृहाचं उद्घाटन केल्यानंतर ते काल बोलत होते. पश्चिम आशियातील संकटाच्या प्रतिकूल परिणामांना सामोरं जाण्यासाठी त्यांनी केलेल्या आवाहनाचा पुनरुच्चारही यावेळी पंतप्रधानांनी केला. ते म्हणाले.....

**पेट्रोल डीजल का उपयोग कम करें। इलेक्ट्रिक बस और पब्लिक ट्रांसपोर्ट का अधिक इस्तेमाल करें। कार पुलिंग को बढ़ावा दें। ये जरूरी है कि सरकारी और प्राइवेट दोनों ही दफ्तरों में वर्क फ्रॉम। को प्राथमिकता दी जाए। मैं कुछ स्कूलों से भी आग्रह करूंगा कि कुछ समय के लिए ऑनलाइन क्लासेज की व्यवस्था पर काम करें। मैं आप सब से आग्रह करूंगा कि जब तक हालात सामान्य न हो हम सोने की खरीद को टालें।**

**<u>पंतप्रधान-सोमनाथ</u>**

तत्पूर्वी, काल पंतप्रधान 'सोमनाथ अमृत महोत्सवा'त सहभागी झाले होते. सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाला 75 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी मंदिरात पूजा केली. पंतप्रधानांच्या उपस्थितीत मंदिराच्या कळसावर 11 तीर्थक्षेत्रांतून आणलेल्या जलाचा अभिषेक करण्यात आला. यावेळी हेलिकॉप्टरमधून मंदिरावर पुष्पवृष्टी करण्यात आली, तसंच, भारतीय वायुसेनेच्या सूर्यकिरण पथकानं चित्तथरारक हवाई कसरती सादर केल्या. 'सोमनाथ अमृत पर्व पुढची हजारो वर्ष भारताला प्रेरणा देत राहील', असं प्रतिपादन पंतप्रधानांनी यावेळी केलं. ते म्हणाले.....

**आजादी के समय सरदार साहब ने 500 से ज्यादा रियासतों को जोड़कर एक भारत का आधुनिक स्वरूप गढ़ा था तो साथ ही सोमनाथ के पुनर्निर्माण से उन्होंने दुनिया को बताया था भारत केवल आजाद नहीं हुआ है। भारत अपने प्राचीन गौरव को पुनः हासिल करने के मार्ग पर भी अब आगे बढ़ चुका है।**

**<u>सोमनाथ मंदिर-राज्यपाल</u>**

सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीला 75 वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्य साधत, काल मुंबईत श्री धाकलेश्वर मंदिरातही एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. राज्यपाल जिष्णु देव वर्मा या कार्यक्रमाला उपस्थित होते. 'अनेक

आक्रमणांनंतरही सोमनाथ मंदिर आजही दिमाखात उभं आहे, हीच भारताच्या सनातन शक्तीची साक्ष आहे', असं प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केलं.

**सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड इथल्या ऐतिहासिक कुणकेश्वर मंदिर परिसरातही 'सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त काल धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**इंधन पुरवठा**

देशात पेट्रोलियम उत्पादनांचा कोणताही तुटवडा नसून 60 दिवस पुरेल इतक्या कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. पश्चिम आशिया संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीगटाच्या बैठकीनंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी काल ही माहिती दिली. देशात 45 दिवस पुरेल इतका स्वयंपाकाचा गॅस आणि 60 दिवस पुरेल इतका नैसर्गिक वायू उपलब्ध असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनीही आंतरमंत्रालयीन बैठकीनंतर वार्ताहरांना याबाबत माहिती दिली. देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असून स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठाही सुरळीत सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. देशात या वर्षीच्या खरीप हगामासाठी खतांचा 51 टक्के साठा उपलब्ध असल्याचं रसायन आणि खतं मंत्रालयाच्या सहसचिव अपर्णा शर्मा यांनी सांगितलं.

**शेलार-कान दौरा रद्द**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनानंतर राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आपला प्रस्तावित 'कान दौरा रद्द केला आहे. तसंच, त्यांच्या विभागासाठी इंधन बचतीचे तीन महत्त्वाचे निर्बंध लागू केले आहेत.

**मुख्यमंत्री-सीआयआय**

'भविष्यात देशाचं आर्थिक नेतृत्व करण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुढील युगासाठी महाराष्ट्र सज्ज असून त्यासाठी सर्व आघाड्यांवर जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु असल्याची ग्वाही त्यांनी दिली. नवी दिल्लीत भारतीय उद्योग महासंघानं आयोजित केलेल्या शिखर परिषदेत ते काल बोलत होते. 2030 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था आणि 2047 पर्यंत जगातील सर्वात महत्त्वपूर्ण प्रादेशिक अर्थव्यवस्थांमध्ये महाराष्ट्राचा समावेश करण्याचं उद्दिष्ट असल्याचं फडणवीस म्हणाले.

**जी राम जी योजना-अधिसूचना**

विकसित भारत जी राम जी, अर्थात 'विकसित भारत रोजगार आणि आजीविका अभियान, ग्रामीण कायदा' 2025 लागू करण्यासंदर्भात, केंद्र सरकारनं काल अधिसूचना जारी केली. येत्या 1 जुलै पासून, देशभरात हा कायदा लागू होणार आहे. या कायद्यानुसार ग्रामीण भागात, प्रत्येक आर्थिक वर्षात किमान 125 दिवस रोजगार मिळण्याची खात्री असेल असं या संदर्भात निवेदन देताना केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहांन यांनी सांगितलं.

**रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यात अनेक ठिकाणी सलग तीन दिवस पडलेल्या जोरदार अवकाळी पावसामुळे मोठं नुकसान झालं असून, जनजीवन विस्कळीत झालं आहे. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**रत्नागिरी जिल्ह्याच्या अर्थकारणाचा कणा असलेल्या हापूस आंब्याचं उत्पादन यंदा मुळात 15 ते 20 टक्केच अपेक्षित होतं. त्यात आता हंगाम अंतिम टप्प्यात असताना हाताशी येणार असलेले तयार आंबे अवकाळी पावसाने अक्षरशः धुळीला मिळाल्यामुळे बागायतदारांचं मोठं नुकसान झालं आहे. रातांब्यांसारख्या पिकांचंही खूप नुकसान झालं**

**आहे. हापूस बागांचे तातडीने पंचनामे करून सरकारने कोणत्याही अटी न घालता सरसकट नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी माजी आमदार बाळ माने यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. रत्नागिरी, लांजा, राजापूर, संगमेश्वर, खेड, दापोली आणि मंडणगड या तालुक्यांमध्ये जोरदार पावसाने अनेक ठिकाणचा वीजपुरवठा खंडित झाला. महामार्गाचं काम अर्धवट असल्याने अनेक ठिकाणी पाणी साचलं, काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं. वीज पडून किंवा झाडं कोसळून घरं, गोठे, कुक्कुटपालन केंद्रांचं नुकसान झालं. एकंदरीतच, या तीन दिवसांत पडलेल्या पावसाने नागरिकांचे मोठे हाल झाले असून, कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालं आहे.**
**आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**आकाशवाणी-गौरव शिंपी**

आकाशवाणीच्या 90व्या वर्षपूर्तीनिमित्त पुणे आकाशवाणीनं रसिक श्रोत्यांसाठी आज एका सांगीतिक मैफिलीचं आयोजन केलं आहे. आज संध्याकाळी 6 वाजता, कोथरूडच्या बाल शिक्षण मंदिर सभागृहामध्ये हा कार्यक्रम होणार आहे.

**नाशिक**

नाशिकमध्ये टीसीएस कंपनीतील महिला अत्याचार प्रकरणातली आरोपी निदा खान हिला काल नाशिक रोडच्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयानं 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. याआधी तिला पोलीस कोठडी देण्यात आली होती. मुदत संपल्यानं काल तिला न्यायालयात हजर करण्यात आलं. दरम्यान टीसीएस प्रकरणात पॉश कायद्याची अजिबात अंमलबजावणी झाली नाही, असा अहवाल राष्ट्रीय महिला आयोगानं नेमलेल्या समितीनं दिला आहे. कंपनीच्या नाशिक शाखेत कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात मानसिक आणि शारीरिक छळ झाल्याचंही या अहवालात म्हटलं आहे.

**जागतिक परिचारिका दिन**

आज जागतिक परिचारिका दिन आहे. या निमित्तानं धुळ्यात परिचारिका संघटना, जिल्हा रुग्णालय, तसंच भाऊसाहेब हिरे मेडिकल कॉलेज यांनी संयुक्तपणे रक्तदान शिबिराचं आयोजन केलं होतं. यामध्ये 30 रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

**क्रिकेट-ICC क्रमवारी**

आयसीसीनं नुकत्याच जाहीर केलेल्या पुरुषांच्या एकदिवसीय सामन्यांच्या सांघिक क्रमवारीत भारताने अव्वल स्थान कायम राखलं आहे. टी -20 क्रिकेट सामन्यांच्या क्रमावरीतही भारताने वर्चस्व राखत अव्वल स्थान कायम ठेवलं आहे.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात उन्हाची तीव्रता वाढली आहे. आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.